दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २७४ वा रविवार दि.२७ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## ‘डॉक्टर नसलो तरी ऑपरेशन करतो

मुंबई : १२ वी नंतर शिक्षण सोडले पण लोकांमध्ये गेल्यावर खर शिक्षण मिळाले. डॉक्टर नसलो तरी छोटी मोठी ऑपरेशन मी पण करतो. शिक्षण नसले तरी २०२२ ला परीक्षा द्यायला गुवाहाटीला गेलो होतो. आता थोडं बाकी राहिलंय ते ही होईल असे म्हणत त्यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता खोचक टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांना खोचक टोला लगावला आहे. ते महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीच्या राज्य अधिवेशनात पालघरमध्ये बोलत होते. १२ वी नंतर शिक्षण सोडले, पण मी माझ्या मुलाला डॉक्टर केले. एज्युकेशन इज द मोस्ट पावरफूल वेपन विच यू कॅन यूज टू चेंज द वर्ड’ असेही यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील शिक्षणावर विशेष भर दिलेला आहे आणि म्हणूनच नवीन शिक्षण धोरण हा त्याचाच एक परिपाक आहे.



शिक्षकांना वंदन करायचे नाही तर कुणाला वंदन करायचे? सगळ्या वैयक्तिक कौटुंबिक समस्या चिंता पोटात घेऊन नव्या पिढीला घडवण्याचे काम शिक्षक करत आहेत, या देशाची नवी पिढी आपण घडवत आहोत. महाराष्ट्राची भावी पिढी घडवणारे हे सर्व शिल्पकार आहेत. आई वडिलांनंतर शिक्षकांचा व्यक्तीच्या आयुष्यात महत्वाचा रोल असतो. पेसा शिक्षक निर्णय देखील पुढच्या कॅबिनेटमध्ये निकाली लागेल असे एकनाथ शिंदे यांनी यावेळी म्हटले आहे.

दरम्यान शिक्षक आमदार आपल्या समस्या सोडवतील, लाडक्या बहीण, लाडके भाऊ, शेतकरी यासाठी आपल्या सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नसलो तरी महाराष्ट्रामधील जनतेला सोन्याचे दिवस आणणारे काम करणार आहे. गुरू प्रत्येकाला लागतो, गुरू शिवाय काही नाही, समाजाचा दोष दूर करण्यासाठी गुरू असावा लागतो, शिक्षक महत्वाचा घटक आहे, कोणाला पुढे न्यायचे, कोणाचा टांगा पलटी करायचा हे आम्हाला माहिती आहे. आम्ही प्रिंटिंग मिस्टेकवाले नसून, वचननाम्याप्रमाणे आश्वासन पाळण्याचे काम आमचे सरकार करत आहे असे म्हणत त्यांनी यावेळी विरोधकांनाही टोला लगावला आहे.

## पानशेत, वरसगाव धरणातील गाळ काढण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करा; मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

पुणे : गाळ साचल्यामुळे धरणातील पाणी साठवण क्षमता कमी होते. त्यामुळे पानशेत व वरसगाव धरणातील गाळाच्या प्रमाणाचे सर्वेक्षण करून गाळ काढण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे- पाटील यांनी दिले. पानशेत व वरसगाव धरणांच्या पाहणी प्रसंगी त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.



यावेळी आमदार राहुल कुल, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हनुमंत गुणाले, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, जलसंपदा यांत्रिकी विभागाचे अधीक्षक अभियंता प्रकाश भोसले, पानशेत व वरसगाव प्रकल्पाचे उपअभियंता मोहन भदाणे, पानशेत प्रकल्पाचे शाखाधिकारी अनुराग मारके आदी उपस्थित होते.

पानशेत व वरसगाव धरणासाठी संपादित जमिनीचा फेरआढावा घेऊन अतिरिक्त संपादित जमिनीचा अहवाल सादर करावा, अशा सूचना देऊन मंत्री विखे- पाटील म्हणाले, पानशेत व वरसगाव येथील महानिर्मिती कंपनीमार्फत कार्यान्वित असलेले जलविद्युत निर्मिती प्रकल्पाबाबत नव्याने अभ्यास करून अतिरिक्त क्षमता वाढविण्यात येईल किंवा कसे याबाबत पाहणी करावी. वरसगाव धरणाची गळती कमी करण्याच्या उपाययोजनेबाबत सविस्तर अंदाजपत्रक करून कार्यवाही करावी, असेही ते म्हणाले.

यावेळी मंत्री विखे- पाटील यांनी वीर बाजी पासलकर यांच्या पुतळ्याचे दर्शन घेतले. वीर बाजी पासलकर यांच्या पुतळ्याचे, परिसराचा सुशोभीकरणाचा आराखडा करून त्याचे उत्कृष्ट काम करावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

कपोले, गुणाले यांनी या धरण प्रकल्पांच्या बाबत त्यांचे बांधकामाचे वर्ष, बांधकामाचा प्रकार, साठवण क्षमता, जलविद्युत निर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती क्षमता आदींच्या अनुषंगाने माहिती दिली. तसेच पानशेत मधील गाळ काढण्याचे काम नाम फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असल्याचे सांगितले. दोन लाख घन मीटर गाळ काढण्याचे नियोजन असल्याचे यावेळी सांगण्यात आले.




अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल वाढदिवस तर २४ एप्रिल रोजी लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे समाधान सूर्यवंशी क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्र क्र.सी लातूर शहर महानगरपालिका, जयंत ताकपिरे अधीक्षक लाईट विभाग यांनी शाल,पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

## भारत-पाक तणावात चीन-इस्रायलची उडी


कराची : वृत्तसंस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडलेल्या पाकिस्तानच्या मदतीला अखेर चीन मैदानात उतरला. पाकिस्तानला चीनने लांब पल्ल्याचे मिसाईल, शस्त्रास्त्रे दिली असतानाच, इस्रायलने भारतासाठी अत्याधुनिक शस्त्रे पाठवली आहेत. यामुळे लष्करी तणाव वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, १५ इस्रायली नागरिक श्रीनगरला पोहोचल्याचीही माहिती आहे, ज्यामुळे संयुक्त ऑपरेशनची शक्यता वर्तवली जात आहे.

आधी या प्रकरणात रक्ताचे पाट वाहण्याची भाषा बोलणारा पाकिस्तान आता बॅकफूटवर आला आहे. या प्रकरणात इस्रायलने एन्ट्री घेऊन भारताची बाजू घेताच पाकिस्तानचा थरकाप उडाला आहे.

चीनने पाकिस्तानला १०० पेक्षा जास्त पीएल-१५ लॉन्ग रेंज एअर टू एअर हल्ला करु शकणारी मिसाइल्स दिली आहेत. हा तणाव कुठल्याही क्षणी मोठ्या युद्धात बदलू शकतो, हा त्यामागचा संदेश आहे. या मिसाइल्सची रेंज २०० किलोमीटर असल्याचे सांगितले जाते.



अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल वाढदिवस तर २४ एप्रिल रोजी लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे अशोक देडे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,सपत्नी यांनी शाल,पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.



अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल वाढदिवस तर २४ एप्रिल रोजी लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे वैष्णवी नेत्रालयाचे डॉ. नंदकुमार डोळे यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या यावेळी अक्षय ऑप्टिकलचे बोळेगावे, संतोष वाघमारे, बाळू मुक्के आदि उपस्थित होते.

## आर्यन सावंत ला मदत करा, हृदय प्रत्यारोपनाची नितांत गरज

आदिलाबाद / प्रतिनीधी :- आदिलाबाद शहरातील आंबेडकर नगर येथे राहणारा आर्यन सावंत वय वर्ष (१४) हा प्रगती शाळेत दहावीत शिकतो. शैक्षणिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या आर्यान लहान वयातच हृदय प्रत्यारोपणाची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर कुटुंब शोकाकुल झाले आहे. आर्थिक अडचणीत सापडलेले हे कुटुंब देणगीदारांच्या पाठिंब्याची प्रतीक्षा करत आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत. दहावीची परीक्षा दिल्यानंतर घर सोडण्याची तयारी करत असताना, आर्यनला छातीत दुखणे, उलट्या आणि जुलाबाचा त्रास होत असताना घरीच कोसळले. पालकांच्या लक्षात आले आणि त्यांनी ठखचड ( आर आय एम एस ) शासकीय रुग्णालयात त्याची चाचणी केली, जिथे त्यांना हृदयविकाराचा त्रास असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी त्याला तातडीने हैदराबादला परत जाण्याचा सल्ला दिला. हैदराबादच्या यशोदा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या टीमने सांगितले की बाबूचे हृदय ९५% ने खराब झाले आहे आणि त्यांना ताबडतोब हृदय प्रत्यारोपणाची आवश्यकता आहे. हृदय प्रत्यारोपणासाठी ५० लाख खर्च येणार असल्याचे त्यांनी सांगितले. औषधे, स्कॅन्स




आणि हॉस्पिटलच्या मुक्कामाच्या वाढत्या खर्चामुळे त्याची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याने आर्यन आदिलाबादला परतला. आई-वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत आहेत. शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्याने पीडित कुटुंबीय मदतीसाठी देणगी मागत आहेत.

## बाबासाहेबांच्या जयंती दिनी सारसोळे येथे संविधान ग्रंथ वाटप..!,

नवी मुंबई / के. एच. हनवते :- सारसोळेगांव येथील पंचशील सामाजिक संस्था यांच्या वतीने विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी कार्यसम्राट मा. नगरसेवक : सुरज पाटील, आयु. सुजाता ताई पाटील यांच्यावतीने उपस्थित मान्यवरांना व उद्याच्या देशाचे उज्वल भविष्य मुलांच्या हातात आहे आणि म्हणून देशाचा महान ग्रंथ भारतीय संविधानाचे वाचन झाले पाहीजे, सशक्त नागरिक घडला पाहीजे हाच एकमेव उद्देश समोर ठेवून या वर्षी आनेक युवकांना संविधान ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : विरेंद्र लगाडे, आरपीआय नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : महेश खरे, समाजसेवक : विजय बाबासाहेब साळे, प्रल्हाद पाटील, यशवंत तांडेल, महादेव पवार, भिमराव तायडे, कोंडीबा हिंगोले,





शिवाजी खडसे तसेच पंचशील सामाजिक संस्था वानाबाई निकम, महीला आघाडी मनिषाताई लगाडे, प्रभावती हिंगोले, मंगल खरात, पद्मिनीताई रणदिवे, आशाताई खंदारे, रत्ना निकम इत्यादी महिलांचे या कार्यक्रमास फारमोठे परिश्रम आणि योगदानातून हा जयंती उत्सव साजरा केला जातो. आसे या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन बौध्दाचार्य : कल्याणराव हनवते हे नेहमीच करत असतात आणि म्हणून सुरज पाटील यांच्या शुभ हस्ते भारतीय संविधान ग्रंथ, शाल व पुष्पगुच्छ भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल रोजी वाढदिवस असल्यामुळे लातूर तहसील कार्यालयातील कर्तव्यदक्ष निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी लातूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मुक्ताफळे, कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय

## पाकची घटिका भरली

पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचा स्पष्ट आरोप करत, केंद्र सरकारने पाकिस्तानच्या विरोधात कठोर पावले उचलण्याची घोषणा केली आहे. आता भारत आणि पाकिस्तानच्या उच्चायुक्त कार्यालयातील एकूण कर्मचार्यांची संख्या ५५ वरून ३० वर आणली जाणार आहे. अटारी-वाघा सीमेवरील तपासणी केंद्र तत्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पाक नागरिकांना तत्काळ माघारी जाण्यास फर्मावले आहे. सिंधू जलकरार स्थगित केल्याची अधिकृत माहितीही भारताकडून पाकला देण्यात आली आहे.

पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी करण्याचा निर्धार भारताने केला असून, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतेह-अल-सिसी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून, पहलगाम घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि या संकटात आम्ही भारतामागे उभे आहोत, असे सांगितले आहे. जगातील कोणत्याही प्रतिष्ठित देशाने पाकिस्तानची बाजू घेतलेली नाही आणि चीननेही आम्ही कोणत्याही स्वरूपाच्या दहशतवादाचा विरोधच करतो, असे म्हटले आहे.

यापूर्वी रशियाने पाकिस्तानसोबतच्या युद्धात सातत्याने भारताला पाठिंबा दिला होता आणि गेल्या अनेक वर्षांपासून इस्रायल आणि भारत संबंधही मजबूत आहेत. कारगिल युद्धाच्या वेळी इस्रायलने भारताला खूप मदत केली होती. गेल्या काही वर्षांत पाकने अमेरिकेशी मैत्री करण्याची धडपड केली; पण ती फोल ठरली. उलट अमेरिकेच्या दृष्टीने भारत ही मोठी बाजारपेठ असून, येथे त्या देशाची प्रचंड गुंतवणूक आहे. त्यामुळे संघर्षाच्या वेळी अमेरिका भारताच्या मदतीला येऊ शकते. देशाच्या शत्रूंनी केवळ नि:शस्त्र पर्यटकांवरच नव्हे, तर देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे दु:साहस केले आहे.

दहशतवादी कारवायांनी देशाचे मनोधैर्य खची होणार नाही, उलट हल्ल्यातील दहशतवादी आणि त्यांच्या पाठीराख्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा दिली जाईल. त्यांची उरलीसुरली ताकदही संपवण्याची वेळ जवळ आली आहे, असा खणखणीत इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. सरकारकडून यासंदर्भात होणार्या कोणत्याही संभाव्य कारवाईला सर्व पक्षांनी एकमुखी पाठिंबा दिला आहे. ज्या घटनेत २८ निरपराध नागरिकांचे हकनाक बळी गेले, त्याबाबत कोते राजकारण करणे चुकीचेच ठरले असते.

केंद्र सरकारने बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे प्रमुख सदस्य उपस्थित होते. त्यावेळी गुप्तचर संस्थेच्या अधिकार्यांनी घटनेची तपशीलवार माहिती दिल्यानंतर, विरोधी सदस्यांनी काही प्रश्न विचारले व शंका उपस्थित केल्या. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सविस्तर उत्तरे दिली. निकोप वातावरणात चर्चा झाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, जबाबदारीचे वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षांचेही अभिनंदन करावे लागेल. अमरनाथ यात्रेवेळी पर्यटक बैसरनला जातात. त्यामुळे तेथे जूनपासून सुरक्षा व्यवस्था तैनात असते; पण यावेळी एप्रिलपासूनच पर्यटक तेथे जाऊ लागले होते.

हजारो पर्यटक जात असताना, याची माहिती ना पोलिसांना होती, ना सैन्यदलांना. केंद्रीय राखीव पोलिस दलही बेदखल होते. गुप्तचर संस्थांनाही याची वार्ता नव्हती, याकडे 'आप'चे खासदार संजय सिंह यांनी लक्ष वेधले आहे. काश्मीर खोर्यात त्रिस्तरीय सुरक्षा व्यस्था असताना, जेथे हजारो लोक जातात, त्याबाबत पोलिसांना कोणतीही माहितीच नसावी, हे कसे? असा रास्त सवाल राहुल गांधींनी विचारला. सुरक्षा व्यवस्थेकडून कुठल्या ना कुठल्या प्रकारची चूक झाली, हे गृहमंत्री शहा यांनी मान्य केले, हे बरेच झाले. चुका मान्य करण्यात काहीच कमीपणा नाही; पण सुरक्षा यंत्रणेतील फटी तातडीने बुजवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. मुख्य म्हणजे, सर्व यंत्रणांमध्ये समन्वयाची गरज आहे.

भारतावर या प्रकारचा हल्ला केला जात असतानाच, पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारनेही पहलगाम घटनेचा निषेध करण्याचा नाटकीपणा केला. सिंधू जलकरारातील पाकच्या हक्काचे पाणी थांबवणे ही युद्धकृती असून, आम्हीही सिमला करार रद्द करत आहोत. तसेच, पाकची हवाई हद्द भारतीय विमानांना बंद करत असल्याचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीर केले. त्याने भारताचे फारसे काही वाकडे होणार नाही. भारताने पाकिस्तानसोबतचा जो काही व्यापार होता, तोही बंद केला आहे. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकमधून येणार्या मालावर २०० टक्के शुल्क लागू केल्यामुळे पाकचे कंबरडे मोडले होते.

आताही सिंधूचे पाणी बंद झाल्यानंतर, पाकिस्तानच्या शेतीची वाताहत होणार आहे. भारताच्या एकूण व्यापारात पाकचा वाटा अर्ध्या टक्क्याच्या आसपास आहे. त्यामुळे पाकिस्तान आपल्या दृष्टीने नाममात्र आहे. गेल्या काही वर्षांत भारताचा जागतिक राजकारणावरील प्रभाव वाढला असून, त्या तुलनेत हा देश कोणाच्या खिजगणतीतही नाही. पाकिस्तानातील बलुचिस्तानमध्ये अशांतता आहे. सत्तेमधील पंजाबी वर्चस्वाविरुद्ध सिंध प्रांतात नाराजी आहे. अफगाणिस्तान व पाकिस्तान संबंध विकोपाला गेले आहेत. पाकव्याप्त काश्मीरची तेथील सरकार उपेक्षा करत असल्यामुळे तेथे अस्वस्थता आहे.

पाकिस्तानातील दहशतवादी सातत्याने त्या देशातच बॉम्बहल्ले करत असतात. २०१९ मध्ये भारताने पाकिस्तानवर प्रतिहल्ला चढवला, तेव्हा मिग-२१ विमान पाकच्या हवाईदलाने पाडले आणि विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना ताब्यात घेतले. अभिनंदन यांची सुटका न केल्यास, पाकिस्तानवर क्षेपणास्त्रे डागण्यात येतील, असा दम भारताने देताच, त्यांची सुटका करण्यात आली. रशियाने युक्रेनवर आणि इस्रायलने गाझात आक्रमण केले, तरीही निषेधाचा स्वर काढण्यापलीकडे आंतरराष्ट्रीय संस्थांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे उद्या भारताने चढाई करून पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेतला, तरी त्यास चीन वगळता कोणी आक्षेप घेईल, असे वाटत नाही. पहलगाम हल्ल्याचा निषेध करत जगातील प्रमुख देशांनी भारताकडे नोंदवलेली सहानुभूतीही येथे महत्त्वाची आहे. तेव्हा आपली घटिका भरत आली आहे, हे पाकिस्तानने लक्षात घेतलेले बरे!

# भूषण गवई देशाला न्याय मिळवून देवू शकतील की त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्यांचे हातुन समाजाविरुद्ध एखादा मोठा निकाल/निर्णय लावुन घ्यायचा आहे ?

भूषण गवई बहुजन चेहरा हा सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त झालेत, पुढील महिन्यात ते आपले कामकाज सुरूही करतील, त्या अगोदरच बहुजन संघटना स्वतः च्या टिऱ्या बडवायला लागल्या आहेत, सोशल मीडिया वर गवई यांच्यावर अभिनंदनाच्या पोस्ट सुरू झाल्यात, जाहीर कार्यक्रम करुन सत्कार सुरू झालेत, सगळीकडे एकच प्रचार आमचा माणूस, आमच्या जातीचा माणूस, आमच्या समाजाचा माणूस म्हणून! अहो पण देशाची सध्याची अवस्था काय आहे? लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शब्दात सांगायचं तर जिथं न्यायव्यवस्थाच सत्तेची रखेल झाली असताना या सत्तेने मांडलेल्या रांड बाजारात तुमच्यातला माणूस जावून काय करणार? लोकशाहीचे चारही खांब संसद, न्यायव्यवस्था, प्रचार प्रसार माध्यम आणि प्रशासन याच या सत्तेच्या बाजारात पालथ्या पडल्या असताना नविन वेगळं काय होणार? संविधानाने स्वतंत्र अधिकार दिलेल्या या स्वायत्त संस्था ज्यांच्यावर आपला पिढ्यानपिढ्या विश्वास होता ती पोलीस यंत्रणा, उइख व एऊसारखी तपास यंत्रणा, निवडणूक यंत्रणा, न्याय व्यवस्था, प्रचार प्रसार माध्यम यासारख्या देशाच्या कारभारावर लक्ष ठेवणाऱ्या संविधानिक संस्थाच सत्ताधिशांची गुलामी करत असताना तुमच्या समाजातील चेहरा आणखीन वेगळं काय करणार? का हे भूषण गवई पुलवामा हत्याकांडातील शहीद सैनिकांच्या विधवांना न्याय मिळवून देऊ शकतील? या माजलेल्या सत्तेने ज्या हिरेन पांड्या, उमर खालिद आणि इतर अनेक बहुजन नायकांना तुरुंगात खितपत ठेवलंय त्यांना हे भूषण गवई सन्मानाने बाहेर काढतील का? न्यायमूर्ती लोया यांचे हत्यारे अमित शाह व देवेंद्र फडणवीस यांच्यावर कारवाई करुन न्यायमूर्ती लोया यांना न्याय मिळवून देतील का? २०२४ लोकसभा निवडणुकीतील घपला केलेल्या ७४ लोकसभा खासदारांना घरी बसवतील का? २०२४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील घपला केलेल्या ९५ आमदारांना घरी बसवतील का? निवडणूक आयुक्त राजीव कुमार गँग ने जे ७६ लाख मतदान अधिक दाखवलंय त्याची पारदर्शक सुनावणी करुन या अनधिकृत फडणवीस सरकार का खाली उतरतील का? निवडणुकीत पारदर्शकता आणण्यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून खितपत पडलेली एतच् मशीन ची केस निकालात आणून पून्हा इरश्र्शीं पेपर वर निवडणूका घेण्यास निवडणूक आयोगाला सांगतील का? भारताच्या इतिहासातील सगळ्यात मोठा भ्रष्टाचार असलेल्या नोटबंदी भ्रष्टाचारात दोषी असलेल्या नरेंद्र मोदी व अमित शाह यांच्यावर कारवाई करतील का? याशिवाय राफेल भ्रष्टाचार व त्याच्या फायली गहाळ झाल्या असे न्यायालयात सांगणाऱ्या प्रधानमंत्री कार्यालयाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करतील का? भारतभरात हिंदू राष्ट्राच्या नावावर जो माजलेल्या सत्तेने हिंसाचार चालवलाय तो थांबवून यात बळी गेलेल्या कुटुंबाना न्याय मिळवून देवू शकतील का? या अशा अनेक केसेस आहेत, ज्यामुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडालाय त्या सर्व केसेस ना न्याय देऊन जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास परत मिळवतील का? अशा या सगळ्या प्रश्नांची उत्तरे तुमच्याकडे होकारात असतील तर आणि तरंच भूषण गवई यांचा सत्कार करा, त्यांच्या नियुक्तीवर आनंद व्यक्त करा, सोशल मीडिया वर अभिनंदनाच्या पोस्ट शेअर करा. नाहीतर न्यायाधीश भूषण गवई यांना जिथे असतील तिथे घेराव घाला, त्यांना हे प्रश्न विचारा! मित्रांनो, सध्या माझा समाज माझी जात या पेक्षा संकटात असलेल्या देशाला वाचविणे गरजेचे आहे.

********


-प्रमोद शिंदे
सचिव व प्रवक्ता, मुंबई प्रदेश
संभाजी ब्रिगेड
९९६७०१३३३६

# पहलगामच्या निमित्ताने : एक चिंतन.

जगातील व देशातील अनेक समस्यांबाबत विचारी माणसं,नेहमी चिंतेत असतात. मात्र त्या समस्यांचे नीट आकलन करुन घेण्यात गफलत करतात.हिंदू मुसलमानांचा द्वेष करतात.मुसलमान हिंदूचा द्वेष करतात.सिमावाद,हिंदीची सक्ती,आव्हान प्रतिआव्हान,मोर्चे-प्रतिमोर्चे यातच आजची युवाशक्ती चीं पडते आहे.आपल्याला हे लक्षात येत नाही की,आपल्या समस्या सोडवण्याचा उपाय सामुदायिक कृती नसून प्रत्येक व्यक्तीने तो ज्या समस्यांनी ग्रासित आहे,त्याबाबत जागृत होऊन,त्याचे अस्तित्व कितीही मर्यादित असले तरी स्वत:चे जगाचे प्रश्न,स्वत:च्या अस्तित्वाचे प्रश्न स्वत:च सोडवले पाहिजेत.भले ते प्रश्न तुमचे वैयक्तिक असोत, परिवाराचे असोत,तुमच्या समाजाचे असोत,तुमच्या धर्माचे असोत,तुमच्या राज्याच, देशाचे अगर उपखंडाचे असोत,ते आपले आपणच सोडवले पाहिजेत.

दुसर्याकडे,दुसऱ्या समाजाकडे,धर्माकडे,राष्ट्राकड ` बोट दावून आपले प्रश्न सुटणार नाहीत.उलट प्रश्नांचा गुंता वाढेल.समुदाय,समाज, संघटना या अमुर्त असतात.गुढ असतात. आणि त्याचा गैरफायदा विशिष्ट विचारसरणी असलेले धार्मिक नेते व राजकारणी लोक घेतात.ते अशा समुदायाचे वा अशा समाजाचे शोषण करतात.समुदाय,समाज वा संघ़टना म्हणजे तुम्ही,मी,आपण व ते अन्य! जेव्हा तुम्ही,मी,आपण वा इतर अन्य नुसते शब्दांनी गोंजारले जातात,तेव्हा आपला व त्यांचा वेगवेगळा समुदाय तयार होतो! जो एकमेकांच्या शत्रुभावी असतो.आणि तो काल्पनिकरित्या एकमेकांचा द्वेष करु लागतो.तेव्हा त्यांच्याकडून व आपल्याकडून केली जाणारी कृती हि भ्रामक असली तरी प्रचंड नुकसानदायी असते.जशी आता पहलगामला झाली आहे.अशी कृती म्हणजे परस्परांच्या काल्पनिक शत्रुत्व भावनांनी नैराश्यात व गोंधळात स्वीकारलेल्या व केलेल्या चुकीच्या घटना असतात.अशा भितीयुक्त वातावरणात जनता अधिक गोंधळून जाऊन,अधिकाधिक नैराश्यातून आपले मार्गदरशक,राजकारणी व धार्मिक नेते निवडतो. आणि ते ही गोंधळलेले असल्यामुळे एकुण गोंधळात आणि नैराश्यात अधिक भय व भर घालतात.हे धार्मिक व राजकीय नेते भले सर्वज्ञता व न्श्चिततेची हवा निर्माण करोत,पण ते गोंधळलेल्यांचे मार्गदर्शक असल्याने ते ही गोंधळलेले असतात.ज्या जगात नेते आणि अनुयायी गोंधळलेले असतात, त्या जगात त्यांनी कळत नकळत कोणत्याही साच्यानुसार वा विचारसरणीनुसार केलेली कृती म्हणजे आणखीनच संघर्षात आणि वैरात वाढ करणे असते.आपले परस्परसंबंध हीच आपली समस्या असते.तुमचे मित्र,शेजारी,समाज, राज्य,राष्ट्र,धर्म,संघटना यांच्याशी तुमचे कल्पना,विचार व श्रध्दांशी परस्परसंबंध जुळलेले असतात.हे परस्परसंबंध म्हणजे विसंवाद आणि संघर्षमय असले तरीही तुम्हाला वाटतं की,तुमच्या प्रिय विचारसरणीनुसार,तुम्ही मनातली कृती केली म्हणजे उपरोक्त सर्वांसह जगात लवकर परिवर्तन वा क्रांती घडून येईल.परंतु तसं घडत नाही.

कोणतीही विशिष्ट विचार वा विचारसरणी परिपूर्ण नसल्याने ती सर्वांना एकत्र आणू शकत नाही.उलट जगाचा इतिहास साक्षी आहे की,असे प्रत्येक नविन विचार वा नवीन गट निर्माण व्हायला ती कारणीभूत होते.विशिष्ट धार्मिक वा वैचारिक विचारसरणीने काही समूह जरुर मंत्रमुग्ध होतात, मात्र भिन्न सामाजिक हितसंबंध असलेले गट कधीच एका छत्रछायेखली एकत्र येवू शकत नाही. आजचे जग ही आपली समस्या आहे. या समस्येचे आकलन करुन होण्यासाठी तुम्ही प्रथम स्वत:ला जाणून घेतले पाहिजे. लक्षात ठेवा स्वत:ला जाणून घेण्यासाठी तुमचे इतरांशी परस्परसंबंध कसे आहेत जे जाणून घ्या. तुमचे सत्य आकलन तुम्हाला जाणता आले पाहिजे. परत लक्षात ठेवा की, दुसऱ्याचा अनुभव हा तुमच्या सत्याच्या आकलनासाठी उपयोगी ठरु शकत नाही. भले ते तुमचे हितचिंतक हो,नेते हो वा गुरु..!



परतु खरी समस्या ही आहे की, जगातील सर्व अतिरेकी धर्म दुसर्यांच्या अनुभवावर आधारलेले आहेत. ज्याच्याशी जनतेचा दुर दुर प्रर्यंत संबंध नसतो.परंतु राजकारण्यांनी व धार्मिक नेत्यांनी जे परस्परसंबंध बिघडवून ठेवलेले असतात त्याचा फटका त्यांच्या अनुयायांना व जनतेला बसतो.सैनिक सैन्यात पोटासाठी भरती होतो,मरणासाठी नाही. परंतु शासनयंत्रणेच्या दृष्टीने तो मरणासाठी भरती झालेला असतो. त्या सैनिकांच्या शवावर त्यांचे शह-काटशहांचे राजकारण खेळत असतात.व त्याला देशनिष्ठा व देशभक्ती हे गोंडस नाव दिले जाते.

शेतकरी स्वत:च्या व समाजाच्या पोटासाठी शेतात राबून धान पिकवतो.मात्र सरकार व व्यापारी संगनमत करुन जातीव्यवस्थेच्या श्रेणीचा वापर करुन एककडे बळीराजाला कात्रीत पकडतात,तर दुसरीकडून जनतेचे शोषण करतात.येथे बळीराजा व व्यापारी यांचे परस्परसंबंध व्यापारी व सरकार यांच्या परस्परसंबंधाच्या चुकीच्या आकलनामुळे शत्रुभावी बनवले जातात.यातून संघ,संघटना,पक्ष,मोर्चे,आंदोलने, हिंसाचार असे अमानवीय चक्र सुर होते. त्याचे रुपांतर पुढे गटबाजी व दगाबाजीत होते. त्याला आंतरराष्ट्रीय हितसंबंधांची जोड मिळते. तेथून जलवाद,भाषावाद,प्रांतवाद, सीमावाद, धर्मवाद जन्माला येतो. त्याच्या संगोपनासाठी व सुरक्षेसाठी खडे सैन्य व अतिरेकी गट तयार केले जातात.मग राजकारणाचा स्टंट व थ्रिलरपटात रुपांतर झाले की. पहलगाम सारख्या घटना घडवून आणल्या जातात.यावर उपाय म्हणून, महात्मा जोतीराव फुलेंनी सर्वांना पोटाशी धरणारा,मधुर,संवादी सत्यसमाज स्थापण केला होता.मात्र त्याला येथील सनातनी धर्माने वाढू दिला नाही.त्याला विरोध करणारा व द्वेषावर आधारित परस्परसंबंध असलेला सनातनी धर्माआडून ते जे द्वेषमुलक राजकारण करत होते,त्याची दुख:द निष्पत्ती पहलगाम सारख्या घटनातून निपजते आहे.त्यावर दुसरा उतारा डॉक्टर आंबेडकर यांनी बौध्दधम्माचा स्वीकारातून व संविधानातून पाजला.भारतीय समाज सशक्त मधूर परस्परसंबंधावर उभारण्याचा प्रयोग त्यांनी केला होता.हे दोन्ही पर्याय चढत्या भाजणीने जेवढे सशक्त बनत जातील, तेवढ्या उतरत्या भाजणीने पहलगाम सारख्या घटना उतरणीला लागतील.

********

राजाराम सूर्यवंशी,
९५०३८६७६०२.
पालघर

# मोबाईलने बालपण हिरावून;मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला.

आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मानसिक त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना,जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात.जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो. त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते कहा गये ओ दिन

*********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# 'स्पंदन २०२५' नृत्य कला महोत्सवातील कलाविष्काराने लातूरकरांची मने जिंकली वैद्यकीय तरुणाईच्या नृत्य सादरीकरणाला भरभरून दाद






लातूर :- महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या वैद्यकीय महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी 'स्पंदन २०२५' नृत्यकला महोत्सवात आपल्या अद्वितीय कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करून लातूरकरांची मने जिंकली. महोत्सवात सादर झालेल्या विविध नृत्य प्रकारांना उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करीत भरभरून दाद दिली. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि माईर एमआयटी पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने या दोन दिवसीय राज्यस्तरीय नृत्यकला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी नृत्यकला महोत्सवाची सुरुवात पारंपरिक गणेश वंदना आणि 'ओमकार स्वरूपा' या गीतावर आधारित नृत्य सादरीकरणाने झाली. त्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या वैद्यकीय, आयुर्वेद, दंत, होमिओपॅथी, फिजिओथेरपी व नर्सिंग महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक नृत्य प्रकारातील शास्त्रीय नृत्य, लोक नृत्य, आदिवासी नृत्य आदी विविध नृत्यप्रकार प्रभावीपणे सादर केले. तरुणाईने सादर केलेल्या समूहनृत्य, एकपात्री सादरीकरण, लोकनृत्य व आदिवासी नृत्य अशा विविध प्रकारांनी रंगत आणली. त्यांच्या जोशपूर्ण आणि कलात्मक सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृहात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रत्येक नृत्य सादरीकरणात जोशपूर्ण व सांघिक क्षमतेचे दर्शन घडले. 'स्पंदन २०२५' नृत्य कला महोत्सवाने वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला व्यासपीठ मिळवून दिले असून, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना दिली आहे. या वेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, समन्वयक डॉ. सुनील फुगारे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. देवेंद्र पाटील, लातूर उपकेंद्राचे समन्वयक डॉ. संतोष डोपे, अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, उपाधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, डॉ. सरिता मंत्री, डॉ. एकनाथ माले, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, प्राचार्य सर्वनन सेना, डॉ. शितल घुले आदी सह एमआयटी शिक्षण संकुलातील प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक पशुवैद्यकीय दिन

जागतिक पशुवैद्यकीय दिन एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनिवारी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश प्राण्यांच्या आरोग्य सेवेबद्दल जागरूकता पसरविणे आणि प्राण्यांवरील क्रूरता रोखण्यासाठी कोणती पावले उचलली पाहिजेत, पाळीव प्राण्यांच्या काळजीशी संबंधित विविध पैलूंबद्दल चांगल्या प्रकारे माहिती देऊन एक जबाबदार पाळीव प्राणी मालक होण्यास आपण कसे सक्षम असणे गरजेचे आहे हे देखील हा दिवस शिकवतो.




जागतिक पशुवैद्यकीय दिनाचा इतिहास १८६३ चा आहे. एडिनबर्गच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक जॉन गामगी यांनी युरोप मधील पशुवैद्यकांना बैठकीसाठी आमंत्रित केले होते. या बैठकीला आंतरराष्ट्रीय पशुवैद्यकीय काँग्रेस असे नाव देण्यात आले. १९०६ मध्ये जागतिक पशुवैद्यकीय काँग्रेसच्या ८ व्या अधिवेशनातील सदस्यांनी एक स्थायी समिती स्थापन केली होती. स्टॉकहोम मधील काँग्रेसच्या १५ व्या अधिवेशनात स्थायी समिती आणि इतर सदस्यांना मोठ्या संघटनेची गरज भासू लागली. त्यामुळे १९५९ मध्ये माद्रिद येथे झालेल्या पुढील काँग्रेस अधिवेशना बरोबरच जागतिक पशुवैद्यकीय संघाची स्थापना झाली. १९९७ मध्ये नवीन राज्यघटना तयार करण्यात आली आणि संघटनेची रचनाही पूर्णपणे बदलण्यात आली. वर्ल्ड व्हेटर्नरी असोसिएशन मध्ये ७० हून अधिक राष्ट्रांतील सदस्यांचा समावेश आहे. असोसिएशन मधील प्रत्येक सदस्याला ठराविक सदस्यता शुल्क भरावे लागते.

२००१ मध्ये जागतिक पशुवैद्यकीय संघटनेने एप्रिलच्या शेवटच्या शनिवारी जागतिक पशुवैद्यक दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला.

जागतिक पशुवैद्यकीय संघटनेने इतर अनेक उपयुक्त प्रकल्प सुरू केले. त्यांनी वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर ॲनिमल हेल्थशी सहकार्य केले आणि ठरवले की जागतिक पशुवैद्यक दिन पुरस्कारही दिला जावा. हा व्यायाम २००८ मध्ये सुरू झाला आणि पशुवैद्यकीय व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरला आहे. हा पुरस्कार प्रथम केनिया पशुवैद्यकीय संघटनेला मिळाला.

*******

प्रवीण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९

# जुगार खेळणाऱ्या १० इसमावर गुन्हा दाखल. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाची कारवाई

लातूर :- जुगार खेळणाऱ्या १० इसमावर गुन्हा दाखल. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाची कारवाई.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहीम राबवून अवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास खोरी गल्ली,मित्र नगर परिसरातील एका घराच्या समोर मोकळ्या जागेत छापा मारून तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना १० जणांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेले मोटरसायकली व मोबाईल तसेच जुगाराचे साहित्य असा एकूण ५ लाख ८९ हजार ३० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

यामध्ये इसम नामे अझर महेबुब शेख, वय ३२ वर्ष, राहणार खाडगाव रोड, लातूर, जमीर खाजामिया शेख, वय ३४ वर्ष, राहणार खाडगाव रोड, लातूर, अलफैज रुक्मुद्दीन शेख, वय २३ वर्ष, राहणार खोरी गल्ली, लातूर, समीर अमीर शेख, वय ३२ वर्ष, राहणार खाडगाव रोड, लातूर, अल्तमश अयुब पठाण, वय २६ वर्ष, राहणार खोरी गल्ली, लातूर, सोहेल रसूलशहा बर्फीवाले, वय २८ वर्ष, राहणार विठ्ठल नगर, लातूर, अरबाज पठाण, वय ३३ वर्ष, राहणार खोरी गल्ली, लातूर, बुरहान लायक सय्यद, वय ३६ वर्ष, राहणार नवाब मोहल्ला, लातूर, जैद नसीरखान पठाण, वय २२ वर्ष, राहणार खोरी गल्ली, लातूर, जैद चांद शेख, वय २२ वर्ष, राहणार पटेल चौक लातूर, असे असून पोलीस अंमलदार रियाज सौदागर यांनी दिलेल्या फिर्याद वरून शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा नोंद करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकातील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे,पोलिस अमलदार साहेबराव हाके,रियाज सौदागर,मनोज खोसे, नितीन कटारे यांनी केली आहे.

# चिखलद-यात प्रोफेसर 'डिजिटल अरेस्ट'

अमरावती : हॅलो, आम्ही तेलंगणा पोलिस आणि सीआयडी मुंबई आहोत. आपण बंगळुरूमध्ये एक सिम कार्ड विकत घेतले. त्याचा गैरवापर झाला आहे. ब-याच महिलांनी तक्रारी केल्या आहेत. म्हणूनच मानवतस्करीचे प्रकरण आपल्याविरुद्ध नोंदवले गेले आहे असे धमकावत एका प्राध्यापकाला डिजिटल अरेस्ट करीत त्यांच्याकडून १४.३० लाख रुपये उकळण्यात आले. प्राध्यापकांना २५ लाख रुपये द्यायचे होते. त्यासाठी वारंवार कॉल करण्यात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यावेळी डिजिटल अरेस्टचे जाळे फेकण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. शांताराम चव्हाण (५६, रा. अनंत नगर, नवसारी) असे चिखलदरा येथे कार्यरत व फसवणूक झालेल्या प्राध्यापकाचे नाव आहे. त्यांना २१ एप्रिल रोजी सकाळी ११:२७ वाजता वेगवेगळ्या मोबाइल क्रमांकावरून व्हॉटस्ॲपवर व्हीडीओ कॉल प्राप्त झाले. महिलांच्या तक्रारींवरून मानवतस्करीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे तुम्हाला सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडावी लागेल. शिक्षेपासून वाचायचे असेल, तर २५ लाख रुपये ऑनलाइन पाठवा, अशी धमकी त्या व्यक्तीने शांताराम चव्हाण यांना दिली. गुन्हा दाखल होण्याच्या भीतीने घाबरलेले प्रा. चव्हाण हे त्या व्यक्तीच्या पूर्णपणे कह्यात गेले. त्यांनी तब्बल १४ लाख ३० हजार रुपये एचडीएफसी बँकेच्या अनोळखी खात्यावर जमा केले. तक्रारदार प्राध्यापकाच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर ऑनलाइन फसवणुकीचे प्रकरण नोंदवले गेले.

# वैद्यकीय शाखेतील विद्यार्थ्यांनी आरोग्यसेवेबरोबर स्वत:मधील कला गुण जोपासावेत प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ; 'स्पंदन २०२५' नृत्य कला महोत्सवाचे थाटात उद्घाटन





लातूर :- वैद्यकीय शिक्षण घेताना केवळ अभ्यास व आरोग्यसेवा यापुरतेच मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव द्यावा. छंद जोपासणं हे मानसिक, शारीरिक आरोग्यासाठीही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि माईर एमआयटी पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय 'स्पंदन २०२५' नृत्य कला महोत्सवाचे उद्घाटन डॉ. मिलिंद निकुंभ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, समन्वयक डॉ. सुनील फुगारे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. देवेंद्र पाटील, लातूर उपकेंद्राचे समन्वयक डॉ. संतोष डोपे, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री आणि संस्थात्मक समन्वयक डॉ. शितल घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. मिलिंद निकुंभ म्हणाले की, विद्यार्थ्यांना आपल्यातील सुप्त कलागुणांचे सादरीकरण करता यावे, यासाठी युवक महोत्सव हे व्यासपीठ अतिशय महत्त्वाचे आहे. या माध्यमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सभाधीटपणा येतो, आत्मविश्वास वाढतो आणि सामाजिक बांधिलकीची जाणीवही अधिक दृढ होते. शैक्षणिक कार्याबरोबर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक आणि सर्जनशील उपक्रमांतही सहभागी होणे गरजेचे आहे. विविध कलागुणांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो आणि त्याचबरोबर आपली समृद्ध भारतीय संस्कृतीही जपली जाते. यापुर्वी युवक महोत्सव हा एका ठिकाणी साजरा केला जात होता. त्यामुळे संबंध राज्यातील विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवणे शक्य होत नव्हते. ही बाब लक्षात घेवून विविध कला प्रकारातील महोत्सव हे राज्यातील विविध विभागात विभागून देवून युवक महोत्सव साजरा केला जात आहे. या संकल्पनेमुळे युवक महोत्सवात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढलेला आहे. युवक महोत्सवाच्या आयोजनामुळे तरुणांना आपली कला, संस्कृती आणि मूल्ये नव्या पिढीसमोर सादर करता येत आहेत. या उपक्रमामुळे धावपळीच्या युगात सकारात्मक ऊर्जाही मिळत असल्याचे डॉ. निकुंभ यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, भारतीय कला आणि संस्कृती ही आपल्या ओळखीचा आत्मा आहे. तरुण पिढीने ही परंपरा पुढे नेण्याचे महत्त्व ओळखून अशा उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घ्यावा. सांस्कृतीक उपक्रमांच्या माध्यमातून तरुणांमध्ये कला, संस्कृती, सौंदर्यदृष्टी आणि सामाजिक बांधिलकी विकसित होते. लातूरमध्ये राज्यस्तरीय नृत्यकला महोत्सव होणे ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. एमआयटी शिक्षण संस्था भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करत राहील, असे डॉ. कराड म्हणाले. या वेळी बोलताना डॉ. सुनील फुगारे यांनी 'स्पंदन २०२५' महोत्सव विद्यार्थ्यांना कलात्मक अभिव्यक्तीसाठी दिलेले व्यासपीठ हे त्यांच्या सर्वांगीण विकासास उपयुक्त ठरेल, असे सांगितले. डॉ. संदीप कडू यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मकतेसोबत सौहार्द जपावे आणि संस्कृतीची जाणीव ठेवावी, असे ते म्हणाले. गणेश वंदना व ओमकार स्वरूपा या गीताने नृत्य कला महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत 'स्पंदन २०२५' नृत्यकला महोत्सवा मागील भूमीका आणि सहभाग याबाबत माहिती दिली. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांचे पथसंचलनाने स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. दिव्यश्री नझारे व डॉ. ना ग्लोरी जनवाडकर यांनी केले. तर शेवटी आभार डॉ. शितल फड यांनी आभार मानले. 'स्पंदन २०२५' नृत्यकला महोत्सवामध्ये राज्यभरातील विविध वैद्यकीय, आयुर्वेद, दंत, फिजिओथेरपी, नर्सिंग आदी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, नृत्यकलेच्या माध्यमातून त्यांनी आपल्या मधील सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले.



अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल रोजी वाढदिवस असल्यामुळे लातूर उपविभागीय कार्यालयातील मनमिळाऊ स्वभावाचे अव्वल कारकून गणेश एकडे यांनी पेढे, पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकून ए के मुजावर, विद्यवान साळुंखे आदी कर्मचारी उपस्थित होते.



अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर. यांचा २२ एप्रिल वाढदिवस तर २४ एप्रिल रोजी लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे न पा घोणे जिल्हाध्यक्ष लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघ, बाळ होळीकर पत्रकार, त्रिंबक कुंभार संपादक दैनिक रत्नापूर, नेताजी जाधव संपादक,एन टी एन न्यूज चैनल, बालाजी वाघलगावे संपादक, दैनिक राजसत्ता, लिंबराज पन्हाळकर संचालक पब्लिक ॲप आदि पत्रकारांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

# पहलगाम हल्ल्याचा बुलढाण्यात मुस्लिम बांधवांनी जामा मजिद मध्ये काळी पट्टी बांधून केली निदर्शने

बुलढाणा/ प्रतिनिधी :- भारत देशात हिंदू-मुस्लीम हे नेहमीच भाईचारा जोपासत गुण्यागोविंदाने राहत आहेत. परंतु काही विघ्नसंतोषी लोकांना हे पसंत नसल्यामुळेच पहलगाम सारखे दहशतवादी हल्ले करुन द्वेष पसरवित आहे.तरीही मुस्लीम समाज बांधवांनी आजही आपल्या भाईचाऱ्याचा सबुत देत बुलढाणा येथील जामा मस्जिद परिसरात पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आज २५ एप्रिल रोजी शुक्रवारची नमाज पढन करून काळी पट्टी बांधून निदर्शने करीत निषेध करण्यात आले.

यावेळी जामा मस्जिदचे इममा मंजूर अकबरी यांनी म्हटले की,पहलगाम येथे दहशतवाद्यांनी बेधुंद गोळीबार केला.यामध्ये निष्पाप नागरिकांना आपला जिव गमवावा लागला.त्यांच्या कुटूंबाला ईश्वर धिर देवो,असेही त्यांनी यावेळी सांगितले.या हल्ल्याचा आम्ही निषेध करीत असुन केंद्र सरकारने या दहशतवाद्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी,अशी मागणी त्यांनी केली.यावेळी राईसोद्दिन काझी म्हणाले की, इस्लाम धर्म हा शांत आणि सयंम शिकवितो.माणसाला माणूसकीने,प्रमाने जिवण जगण्याचे संदेश देतो.ते पुढे बोलतांना म्हणाले की,कोणताही धर्म हा दहशतवादीचे शिक्षण देत नाही,




असेही त्यांनी प्रसार माध्यमाशी बोलतांना सांगितले. पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या नागरिकांच्या दुःखात आम्ही त्यांच्या सोबत आहे.या भ्याड हल्ल्याचा आम्ही मुस्लीम बांधव शुक्रवारची नमाज पढन करुन काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त करीत आहेत.केंद्र सरकारने या दहशतवाद्यांचा कायमचा बंदोबस्त करून परत एकदा हिंदु-मुस्लीम बांधवांना भाईचाऱ्याचे दर्शन घडवून आनंदाने जगू द्यावे,अशी मागणीही त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.यावेळी उपस्थित मुस्लिम बांधवांनी हिंदुस्तान जिंदाबाद,पाकिस्तान मुर्दाबाद अश्या घोषणा दिल्या.यावेळी ॲड.राज शेख,मोहम्मद दानिश,सैय्यद जुनेद डोंगरे,डॉ.मोबीन खान, माजी नगर सेवक मोईन काझी, इरफान कुरेशी, मौलाना सलमान, रफिक कुरेशी यांच्यासह आदी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## : पर्यटकांसाठी जीवाची बाजी लावलेल्या आदिल शाहच्या कुटुंबाला शिंदेंकडून मोठी मदत

पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यावेळी आदिल शाह यांचा पर्यटकांना वाचवताना मृत्यू झाला होता. अतिरेक्यांनी आदिल शाह यांची गोळ्या झाडून हत्या केली होती.

आता आदिल शाहच्या कुटुंबाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे घर बांधून देणार असल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांनी आदिल शाह यांच्या कुटुंबीयांना व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला आहे.

शिंदेंनी व्हिडिओ कॉलद्वारे आदिल शाह यांच्या बंधूशी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी कुटुंबीयांची विचारपूस केली तसेच कुटुंबीयांनी शिंदेंचे आभार मानले. यावेळी आदिल शाह यांच्या भावाने हल्ल्यावेळी नेमके काय घडले याची माहिती एकनाथ शिंदे यांना दिली. आदिल शाह हा घोडा सवारी करण्यासाठी तिथे गेला असताना दुपारी २ च्या सुमारास हल्ला झाला. आम्ही त्याला संपर्क करण्याचा प्रयत्न करत होतो परंतु कॉल लागत नव्हता, अशी माहिती आदिल शाह यांच्या भावाने शिंदेंना दिली.

पुढे त्यांनी सांगितले की, संध्याकाळपर्यंत आम्ही त्याची वाट बघत बसलो. नंतर ५ वाजता मी इथल्या स्थानिक पोलिस ठाण्यात गेलो व तिथे हरवला असल्याची तक्रार दाखल करून घ्यायला सांगितली.

# विभागीय कार्यालय,अंबाजोगाई अंतर्गत उपविभाग केज येथे लकी डिजिटल ग्राहक योजनेतील विजेत्या ग्राहकांना बक्षीस वितरण

केज/प्रतिनिधी विभागीय कार्यालय,अंबाजोगाई अंतर्गत उपविभाग केज येथे लकी डिजिटल ग्राहक योजनेतील विजेत्या ग्राहकांना बक्षीस वितरण करण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी केज येथील उपकार्यकारी अभियंता मोहियोदिन सय्यद यांच्या हस्ते लकी डिजिटल योजनेतील ग्राहकांना बक्षीस वितरण करण्यात आले.यामध्ये विष्णू बाबुराव तांबे रा. केज,गणेश सखाराम परदेशी रा. वाघेबाभळगाव,आश्रुबा सुखदेव गोरे रा.बनसारोळा,सागरराव दाजीबा मस्के रा.केज,शेख अमीन शेख रतन रा. कोरडेवाडी या ग्राहकांना मोबाईल बक्षीस देऊन त्यांचे सन्मान करण्यात आला. यावेळी अकाऊंटर राऊत, ज्युनिअर इंजिनिअर अडील साहेब यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

वीज ग्राहकांसाठी बक्षीस मिळवण्यासाठी सविस्तर माहिती अशी की,तीन मासिक लकी ड्रॉ योजना-उपविभाग स्तरावर चालणार आहे.या योजनेच्या कालावधीत सलग मागील तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिन्यांपासून ऑनलाइन पद्धतीने विज भरणा करणारे आणि १० रुपये पेक्षा कमी थकबाकी असलेल्या ग्राहकांसाठी योजनेचा कालावधी हा पाच महिने दिनांक १/१/२०२५ ते ३१/५/२०२५ पर्यंत,एप्रिल-२०२५, ते मे-२०२५ आणि जून-२०२५ मध्ये अनुक्रमे पहिला, दुसरा आणि तिसरा लकी ड्रॉ काढण्यात येईल. सदर योजने अंतर्गत लकी ड्रॉ ऑनलाइन पद्धतीने काढला जाईल. सदर योजना ही महावितरणच्या अशा लघुदाब चालू (ङ्ढ ङ्ढींश) वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी १ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्षांपासून म्हणजे १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरण्यासाठी पर्याय वापरलेला नाही. सदर योजना सार्वजनिक पाणीपुरवठा आणि पथ दिवे श्रेणीतील ग्राहकांना,तसेच फ्रँचायझी क्षेत्रातील ग्राहकांना लागू राहणार नाही.ग्राहकास योजनेच्या कालावधीत ऑनलाइन भरणा पर्याय नेट बैंकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, छ-उक, क्यूआर कोड, छएऋढ, ठढऋड इ.) वापरून सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने भरणा करणे आवश्यक राहील. लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिन्यात, दरमहा एक असे, ऑनलाईन भरणा पर्याय वापरून देयक अदा करणे आवश्यक राहील. दरमहा वीज देयक भरणा किमान रक्कम रु. १००/- असणे आवश्यक आहे.ज्या महिन्यामध्ये लकी ड्रॉ घोषित केला जाईल, त्याच्या आधीच्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी ग्राहकाची बीज देयक थकबाकीची रक्कम रु.१०/- पेक्षा कमी असावी. योजनेच्या कालावधीत ग्राहक / ग्राहक क्रमांक फक्त एकाच बक्षिसासाठी पात्र असेल.सदर योजना महावितरणच्या वतीने ग्राहकांना ऑनलाइन पेमेंट करण्यास प्रोत्साहित करण्याच्या प्रयत्नांपैकी एक आहे. सदर योजना कोणत्याही प्रकारचा



जुगार किंवा तत्सम गोष्टींना पाठिंबा / प्रोत्साहन देत नाही. सदर योजना सर्व ग्राहकांना विजेते बनवण्याची हमी देत नाही. सदर योजने अंतर्गत विजेत्यांच्या निवडीसाठी पारदर्शक संगणकीय पद्धतीने याद्रीच्छिक क्रमांक निवड प्रक्रिया वापरली जाईल सदर योजने बाबत ग्राहकांना जागरूक करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले जातील परंतु महावितरण प्रत्येक ग्राहकांशी थेट संवाद साधण्याची हमी देत नाही. सदर योजनेच्या प्रसिद्धी साठी महावितरणकडून विविध माध्यमांद्वारे प्रयत्न केले जातील असे कि, महावितरणच्या वेबसाइट वर, वर्तमान पत्रांद्वारे, ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर संदेश इत्यादी.महावितरणकडे उपलब्ध डेटानुसार बक्षीस जिंकणाऱ्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर ग्राहुकांना संपर्क / सूचित केले जाईल. विजेत्या ग्राहकांकडून १० दिवसांच्या आत प्रतिसाद न दिल्यास, सोडतीच्या प्रतिक्षा यादीत निवडलेल्या ग्राहक क्रमांकांना बक्षीस वाटप कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील / असेल.अकस्मात घटना घडल्यास (जसे की,आग, पूर, संप, युद्ध, वैधानिक आवश्यकता इत्यादींसह परंतु इतकेच मर्यादित नाही.) सदरचा लकी ड्रॉ निलंबित कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील / असेल आणि कोणताही विजेता ग्राहक अशा बक्षीसावर दावा करू शकत नाही.विजेत्याने ओळखीचा पुरावा जसे की,पॅन कार्ड आणि वास्तव्याचा पुरावा जसे की,आधार कार्ड व चालू महिन्याचे वीज देयक व देयक भरणा केल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे.भाषांतरित आवृत्ती मधील एखादया अटी व शर्तीच्या अर्थाबाबतीत विवाद असल्यास इंग्रजी आवृती ग्राहय धरण्यात येईल. अविस्तर अटी आणि शर्तीसाठी महावितरणच्या संकेत स्थळावर भेट देवून सविस्तर माहिती जावून घेण्यात यावी व ग्राहाकांनी दरमहा विज भरणा करून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन उपकार्यकारी अभियंता मोहियोदिन सय्यद यांनी केले आहे.

# येवता जिल्हा परिषद शाळेचे घवघवीत यश,पालकांनी सर्व शिक्षकांचे मानले आभार

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील येवता येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरतन कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत कु.अनुष्का कमलाकर जोगदंड ,कु. वैष्णवी वचिष्ट साळवे ,कु. ईश्वरी हनुमंत सव्वाशे या तीन मुली स्कॉलरशिप साठी पात्र झाल्या आहेत.या निमित्ताने जिल्हा परिषद शाळेत त्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर, जाधव सर,रुद्रे सर,आशोक जोगदंड सर, सतिष जोगदंड सर, अंबादास काळे सर, केदार सर, वाघमारे सर,गायसमुद्रे सर,श्रीमती वंदना कोकाटे मॅडम यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षकांनी व पालकांनी पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार केला व आलेल्या पालकांनी आपल्या मुलांना शिकण्यासाठी शिक्षकांनी मेहनत घेऊन शिकवले त्यामुळे आमचे मुले या परीक्षेत पात्र झाली त्यामुळे सर्व पालकांनी मिळुन



सर्व शिक्षकांचे आभार मानुन सत्कार केला. यावेळी मुख्याध्यापक श्री शिंदे सर यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की,आम्ही जे काम चांगले केले आहे ते चांगले मना विनाकारण शिक्षकांना त्रास देऊ नका जेने करुन आपल्या शाळेतील विद्यार्थी असेच घडतील आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर जिल्हा स्तरावर आपले नाव कोरले आहे अनेक स्पर्धांमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थी आम्ही घडवत आहोत असे मत व्यक्त केले तर श्री सतिष जोगदंड सर यांनी आम्ही आपल्याला ज्ञान देण्याचे काम करतो ते तुम्ही घेतले पाहिजे असे मत मांडले या पात्र विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी श्री अशोक जोगदंड सर श्री सतीश जोगदंड सर व अंबादास काळे सर यांनी विशेष योगदान दिले.

# मोल मजुरी करणाऱ्या कुटुंबातील मुलगा झाला महसूल सहाय्यक

केज/ प्रतिनिधी केज शहरातीलय रहिवाशी असलेले व बांधकाम मिस्त्री म्हणून काम करणारे नागेश लांडगे यांनी मोल मजुरी करून मुलगा नितीन याला शिकवायचे म्हणून सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे शिक्षण घेण्यासाठी ठेवले काबाड कष्ट करून नियमित त्याच्या गरजा भागेल एवढा पैसा द्यायचे नितीन याने देखील आपल्या आई वडलाच्या कष्टाची जाणीव ठेवून अगदीच काटकसर करून अभ्यासाकडे लक्ष दिले. २२२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग ची परीक्षा दिली यामध्ये नितीन नी चांगल्या मार्कांनी पास करून आपल्या आई वडलाच्या कष्टाची जाण ठेवून यशस्वी होऊन दाखवले. नितीन नागेश लांडगे याने मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे शुक्रवारी नितीन च्या यशाबद्दल त्याचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी चतुर्वेद प्रतिष्ठाण चे



अध्यक्ष श्रीनिवास केजकर, धनंजय कुलकर्णी, श्रीधर खोत, आबा केजकर, कमलाकर केजकर, मोहन केजकर, नितीन चे वडील नागेश लांडगे, सचिन लांडगे उपस्थित होते. या यशाचे पूर्ण श्रेय माझ्या आई वडलांनाच नितीन लांडगे यांनी बोलताना सांगितले की,माझ्या यशाचे पूर्ण श्रेय हे माझ्या आई वडलांचे आहे त्यांच्या पासून लांब राहून त्यांनी काबाड कष्ट करून माझं शिक्षण पूर्ण करण्यासाठी मला प्रोत्साहित केले याची मला पूर्ण जाणीव आहे त्यामुळे माझे हे यश फक्त माझ्या आई वडलांचे आहे.

# लातूर, धाराशिव जिल्ह्यात कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे ऊस शेतीचा पायलट प्रकल्प सुरु

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि मॅपमायक्रॉप यांच्यात धोरणात्मक भागीदारी

लातूर :- शेती पद्धतींमध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या एका क्रांतिकारी उपक्रमात मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि मॅपमायक्रॉप यांनी आज एक ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे. हे दूरदर्शी सहकार्य ऊस पीक उत्पादन वाढविण्यासाठी, वैज्ञानिक पाणी संवर्धन तंत्रांचा अवलंब करण्यासाठी, मातीच्या आरोग्याची पुनर्स्थापना करण्यासाठी आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आव्हानांवर मात करण्यासाठी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करणारा महाराष्ट्रातील पहिला खाजगी साखर कारखाना बनला आहे, ज्यामुळे उद्योगासाठी उत्पादकता आणि शाश्वतता वाढविण्याच्या दिशेने एक परिवर्तनकारी पाऊल पडले आहे. लातूर आणि धाराशिव सारखे जिल्हे समाविष्ट असलेल्या मराठवाडा प्रदेशाने दीर्घकाळापासून पारंपारिक शेती पद्धतींचे पालन केले आहे. जे पिढ्यानपिढ्या बऱ्याच प्रमाणात अपरिवर्तित राहिले आहेत. स्थानिक शेतकरी सामान्यतः पारंपारीक पद्धतींमध्ये अनयिंत्रीत पाणी व खतांचा वापर करत असलेल्या पध्दतीमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने माती आणि जमिनीचा प्रकार, घेर, सुक्रोजचे प्रमाण, फायबर टक्केवारी आणि रोग प्रतिकारशक्ती यावर आधारित उपगृहाच्या डेटाचे विश्लेषण करून शेतक-यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, मांजरा ग्रुपच्या कार्यक्षेत्रात एक व्यापक पायलट प्रकल्प सुरू केला आहे, जो प्रथम धाराशिव व लातूर जिल्ह्यातील संलग्न शेतकऱ्यांवर केंद्रित असेल. हा उपक्रम शेती पद्धतींचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल आहे.

याप्रसंगी मॅपमायक्रॉपचे श्री शिरोळे, श्री डॉ गोसावी, श्री प्रज्योत बोथरा, आदर्श नायर, यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, यामध्ये ऊस वाढवण्यासाठी उपग्रह इमेजिंगमधील कौशल्य आणि एआय टूल्सचा समावेश आहे. हवामान परिस्थिती लक्षात घेऊन ऊस पिकांच्या वनस्पती निर्देशांकाचे मूल्यांकन करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान मल्टीस्पेक्ट्रल उपग्रह डेटा वापरते. एक एआय मॉडेल या डेटावर प्रक्रिया करते आणि ९५ टक्के अचूकतेसह साखर पुनर्प्राप्ती दरांचा अंदाज लावते. अचूक कापणी नियोजन सुनिश्चित करण्यासाठी ही पद्धत प्रमाणित केली गेली आहे. या परिवर्तनकारी करारांतर्गत, मॅपमायक्रॉप सहभागी शेतकऱ्यांना वैयक्तिकृत, डेटा-आधारित मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी त्यांच्या अत्याधुनिक -ख-संचालित कृषी प्लॅटफॉर्मचा वापर करेल. हे डिजिटल टूल्स अनेक महत्त्वपूर्ण रिअल-टाइम विश्लेषण प्रदान करतील, ज्यामध्ये सर्वसमावेशक पीक आरोग्य मूल्यांकन, तपशीलवार माती पोषक द्रव्य प्रोफाइलिंग, प्रगत कीड आणि रोग शोध अल्गोरिदम, अभूतपूर्व अचूकतेसह हायपर लोकल हवामान अंदाज, आणि अनेक पर्यावरणीय बदलावर आधारित उत्पादन मॉडेलिंग यांचा पण समावेश आहे. आम्ही हे तंत्रज्ञान केवळ शेतकऱ्यांच्या खर्चामध्ये बचत करून उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ करण्यासाठीच वापरणार नसून या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे साखर कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी, रिकव्हरी, सुक्रोजचे प्रमाण, फायबर टक्केवारी तोडणी, वाहतूक नियोजनासाठी व रिअल-टाइम अपडेट्ससाठी इंटेलिजेंट डॅशबोर्ड आहे.

मॅपमायक्रॉप यापूर्वी बारामती ग्रो ट्रस्ट यांनी केलेल्या पायलट प्रकल्पामध्ये प्रती हेक्टर उत्पन्न व साखर उतारा मध्ये उल्लेखनीय परिणाम दिसून आले आहेत. हा अनुभव आणि तांत्रिक ज्ञानसंपदा आता मराठवाड्यातील पारंपारीक पद्धतीने शेती करणा-या शेतक-यांना तांत्रिक सहकार्यासाठी उपलब्ध केले आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या परिणामांच्या सर्वसमावेशक मूल्यांकनानंतर व्यापक विस्तार केला जाईल.

ओडीसा व मध्यप्रदेश राज्य सरकार तसेच कर्नाटक व उत्तर प्रदेश राज्यातील कारखान्यांनी पण मॅपमायक्रॉप सोबत या प्रकराचे सामंजस्य करार केले आहेत. कारखान्याच्या सुत्रांनी सामंजस्य करार जाहीर करण्याच्या समारंभादरम्यान या उपक्रमाच्या परिवर्तनकारी क्षमतेवर भर दिला.

शेती उत्पादकता वाढविण्यासाठी आणि आमच्या शेतकरी समुदायांसाठी शाश्वत उपजीविका सुरक्षित करण्यासाठी विज्ञान-आधारित दृष्टिकोनाकडे संक्रमण करणे आता ऐच्छिक नाही तर अत्यावश्यक आहे. ही धोरणात्मक युती दैनंदिन शेती पद्धतींमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचे निर्विघ्न एकत्रीकरण सुलभ करेल. मला पूर्णपणे खात्री आहे की ही भागीदारी आमच्या कृषी क्षेत्रात तांत्रिक क्रांतीची सुरुवात दर्शवते. उद्योगतज्ज्ञांनी भाकीत केले आहे की, हा अग्रगण्य उपक्रम संपूर्ण मराठवाड्यात कृषी आधुनिकीकरणासाठी निर्णायक 'रोडमॅप' म्हणून काम करेल, जो संभाव्यतः महाराष्ट्र आणि त्यापलीकडील शाश्वत ऊस लागवडीचे भविष्य पुनर्रचित करेल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE